P06

# 2015

## PAPER I

## पेपर क्रमांक I

## Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act

## सिव्हील प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पेसीफिक रिलिफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट्स, सेल ऑफ गुड्स ॲक्ट आणि पार्टनरशिप ॲक्ट

*Time : 3 Hours* | *Max. Marks : 100*
*वेळ : 3 तास* | *गुण : 100*

***Note :***
***सूचना :***

(1) ***All*** *questions are* ***compulsory.***
***सर्व*** *प्रश्न सोडविणे* ***आवश्यक*** *आहे.*

(2) *Question No.* ***1*** *carries* ***20*** *marks.* ***All*** *other questions carry* ***equal*** *marks i.e.* ***16*** *marks* ***each.***
*प्रश्न क्रमांक* ***1*** *ला* ***20*** *गुण असून. उर्वरित* ***सर्व*** *प्रश्नांना* ***समान*** *म्हणजेच* ***16*** *गुण आहेत.*

(3) *Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provision of law.*
*उत्तरे मुद्देसुद असावीत. आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदीं नमूद कराव्यात.*

(4) *Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
*उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.*

(5) *Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*
*ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."*
*"उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

P.T.O.

(7) ***English** version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.*
*कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) ***All** questions can be attempted only in one language either in **English** or in **Marathi** as per the option given in the application form.*
*उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

(9) *Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.*
*उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.*

---

**1.** Write a Judgement on the basis of the facts narrated below :

While writing Judgement :

(a) adhere to the contents of Judgement as required under the Code of Civil Procedure.

(b) frame and answer the issues properly.

(c) wherever necessary, fill up the details from your imagination.

(d) give legal, logical and proper reasons for your findings.

(e) conclude the Judgement with a proper operative order.

खाली नमूद केलेल्या कथनावरून न्यायनिर्णय लिहा :

न्यायनिर्णय लिहीताना :

(अ) दिवाणी आचार संहितेमध्ये अभिप्रेत असलेल्या मसूद्याचे पालन करा.

(ब) योग्य ते मुद्दे काढा आणि त्यांची योग्य ती उत्तरे लिहा.

(क) आवश्यकतेनुसार तुमच्या कल्पनाशक्तीनुसार तपशील द्या.

(ड) तुमच्या निष्कर्षांच्या पुष्टयर्थ तर्कसंगत, कायदेशीर व योग्य कारणे द्या.

(इ) योग्य तो अंतिम आदेश लिहून न्यायनिर्णयाचा शेवट करा.

---

**Facts :**

'A', 'B' and 'C' are real brothers and sons of deceased 'X'. 'X' inherited Agricultural Lands (P1, P2 and P3).

During the lifetime of 'X', Agricultural Land (P4) was purchased.

**Averments in plaint :**

'B', Plaintiff has contended that Lands (P1 to P4) are Joint family properties of plaintiff and defendants. There is no partition of these properties by metes and bounds. He claims 1/3$^{rd}$ share and separate possession in suit properties.

**Written statement of Defendant No. 1 'A' :**

'A' claims that Land (P4) is his self acquired property and it stands in his name as per revenue records. He further claims that 'B' and 'C' have not challenged revenue entries till date. There is no dispute that Lands (P1 to P3) are joint family properties.

**Written statement of Defendant No. 2 'C' :**

'C' contends that since during long illness of 'X' he has taken good care of 'X', Land (P4) is gifted orally by 'X' to him. Rest of contentions of plaint are admitted.

**Evidence :**

'A', 'B' and 'C' are only Agriculturist by occupation.

Lands (P1 to P3) are being cultivated separately by 'A', 'B' and 'C' after death of 'X'.

Land (P4) is in name of 'A' as per 7×12 extract.

**तथ्ये :**

'अ', 'ब' व 'क' हे सख्खे भाऊ असून दिवंगत 'क्ष' ची मुले आहेत. शेतजमीनी (P1, P2 व P3) ह्या 'क्ष' याला वारसाहक्काने मिळाल्या आहेत.

'क्ष' च्या हयातीत शेतजमीन (P4) ची खरेदी झाली.

**वादपत्रातील कथने :**

वादी 'ब' चे म्हणणे आहे की, जमीनी (P1 ते P4) ह्या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची मालमत्ता आहे. या मालमत्तेचे सरस-निरस वाटप झालेले नाही. वादी 1/3 जमीनीचा हिस्सा व वेगळा ताबा मागतो.

**प्रतिवाद पत्र – प्रतिवादी क्र. 1 'अ' :**

'अ' चे म्हणणे आहे की, जमीन (P4) हि त्याची स्वकष्टार्जित मालमत्ता आहे व महसूल नोंदी प्रमाणे त्याच्या नावावर आहे. त्याचे असेही म्हणणे आहे की, 'ब' व 'क' ने अद्याप पर्यंत महसूल नोंदीला आक्षेप घेतलेला नाही. जमीनी (P1 ते P3) या एकत्र कुटुंबाची मालमत्ता असल्याबद्दल आक्षेप नाही.

**प्रतिवाद पत्र - प्रतिवादी क्र. 2 'क' :**

'क' चे असे म्हणणे आहे की, 'क्ष' च्या दीर्घ आजारपणात त्याने 'क्ष' ची चांगली काळजी घेतल्यामुळे 'क्ष' ने जमीन (P4) ही तोंडी बक्षीसाने त्याला दिली आहे. वादपत्रातील इतर कथने मान्य केली.

**साक्षीपुरावा :**

'अ', 'ब' व 'क' हे व्यवसायाने केवळ शेतकरीच आहेत.

जमीनी (P1 ते P3) ह्या 'क्ष' च्या मृत्युनंतर 'अ', 'ब' व 'क' हे वेगवेगळे कसत आहेत.

जमीन (P4) चा सातबाराचा उतारा 'अ' च्या नावे आहे.

**2.** Answer any ***two*** of the following sub-questions :

(a) Discuss, Rights and Liabilities of Seller and Buyer in the transaction of sale of immovable property.

(b) Rights and Liabilities of Partners *inter se* and with third parties — Discuss.

(c) Discuss essentials of a valid transfer of property.

खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) स्थावर मालमत्तेच्या विक्री मध्ये विक्रेता व विकत घेणारा यांच्या अधिकारांची व जबाबदाऱ्यांची चर्चा करा.

(ब) भागीदारांची आपापसात व इतरां संबंधित हक्क व जबाबदाऱ्यांची चर्चा करा.

(क) वैध मालमत्ता हस्तांतरणाकरिता आवश्यक बाबींची चर्चा करा.

---

**3.** Write short notes on any ***four*** of the following :

(a) Return of plaint and Rejection of plaint

(b) Indemnity and Warranty

(c) Bailment and Pledge

(d) Condition and Warranty

(e) Stay of suit and Bar of further suit

(f) Conclusiveness and Presumptions of Foreign Judgements

खालीलपैकी कोणत्याही ***चार*** च्या संदर्भात टीपा लिहा :

(अ) वादपत्र परत करणे आणि वादपत्र फेटाळणे

(ब) क्षतिपूर्ति आणि हमी

(क) जमानत आणि तारण

(ड) शर्ती आणि हमी

(इ) दाव्याची स्थगिती आणि पुढील दावा रोध

(फ) परदेशी न्यायनिर्णयाची निर्णायकता व गृहीतके

---

**4.** Answer any ***two*** of the following sub-questions :

(a) Discuss Rights and Liabilities of a Mortgagor.

(b) Discuss Rights and Liabilities of Lessor and Lessee in respect of Lease of immovable property.

(c) In which circumstances is Agreement rendered void ?

खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) गहाण ठेवणाऱ्याचे अधिकार व जबाबदाऱ्यांची चर्चा करा.

(ब) स्थावर मालमत्तेच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यामधील भाडेपट्टादेणारा व घेणारा यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची चर्चा करा.

(क) करार कोणकोणत्या परिस्थितीत अवैध ठरतात ?

---

5. Answer any ***four*** of the following sub-questions :

(a) Doctrine of Election

(b) Stoppage in Transit

(c) Fraudulent Transfer

(d) Compromise of Suit

(e) Interest, Cost and Compensatory Cost

(f) Contingent Contract

खालीलपैकी कोणत्याही ***चार*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) निवडीची तत्वप्रणाली

(ब) वस्तु मार्गात अडवणे

(क) फसवणुकीने केलेले हस्तांतरण

(ड) दाव्याची आपापसात तडजोड

(इ) व्याज, दाव्याचा खर्च आणि भरपाई देणारा खर्च

(फ) घटना सापेक्ष करार

---

6. Answer any ***two*** of the following sub-questions :

(a) Suit by or against government or public officer (discuss relevant provisions).

(b) Determination of Lease of immovable property.

(c) Explain the difference between set-off and counterclaim.

(d) Deal with provisions regarding "suit by Indigent Person".

खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) सरकार अथवा सरकारी अधिकाऱ्यां विरुद्ध दावा (संबंधित प्रावधानांची चर्चा करा).

(ब) स्थावर मालमत्तेच्या भाडेपट्टा कसा संपुष्टात येतो.

(क) वजावट व प्रतिहक्क मागणी मधील फरक स्पष्ट करा.

(ड) "निर्धन व्यक्ती कडून दावा" संबंधित प्रावधानांचा संदर्भ घेऊन लिहा.

---

★ SEAL ★ SEA